# श्रीमद् भागवत रसिक कुटुंब

श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

## रुद्र गीत



### श्रीमद्भागवतमहापुराणम्

### चतुर्थः(स्) स्कंधः

### अथ चतुर्विं(म्)शोऽध्यायः

**मैत्रेय उवाच**

**विजिताश्वोऽधिराजाऽऽसीत्- पृथुपुत्रः(फ्) पृथुश्रवाः।**
**यवीयोभ्योऽददात्काष्ठा, भ्रातृभ्यो भ्रातृवत्सलः ॥ 1 ॥**

**विजिताश्वोऽ + धिराजाऽऽ + सीत्, यवी + योभ्योऽ + ददात् + काष्ठा**

**मैत्रेय म्हणतात- पृथूच्या नंतर त्याचा पुत्र परम यशस्वी विजिताश्व सम्राट झाला . त्याला आपल्या लहान भावां बद्दल प्रेम होते . म्हणून त्याने चौघांना एकेका दिशेचे राज्य दिले**

**हर्यक्षायादिशत्प्राचीं(न्), धूम्रकेशाय दक्षिणाम्।**
**प्रतीचीं(वँ) वृकसं(ञ्)ज्ञाय, तुर्यां(न्) द्रविणसे विभुः ॥ 2 ॥**

**हर्य + क्षाया + दिशत् + प्राचीं(न्), वृक + सं(ञ्)ज्ञाय**

**त्याने हर्यक्षाला पूर्व, धूम्रकेशाला दक्षिण, वृकाला पश्चिम आणि द्रविणाला उत्तर दिशेचे राज्य दिले .**

**अन्तर्धानगतिं(म्) शक्राल्- लब्ध्वान्तर्धानसं(ञ्)ज्ञितः।**
**अपत्यत्रयमाधत्त, शिखण्डिन्यां(म्) सुसम्मतम् ॥ 3 ॥**

अन्तर्धा + नगतिं(म्),लब्ध्वान्+ तर्धा + नसं(ञ्)ज्ञितः ,अपत्य+ त्रयमा + धत्त

शिखण् + डिन्यां(म्), सुसम् + मतम्

त्याने इंद्रा पासून आंतरधान होण्याची शक्ती प्राप्त करून घेतली होती .म्हणून त्याला अंतरधान असेही म्हणतात .त्याच्या पत्नीचे नाव श्रीखंडी नी होते .तिच्यापासून त्याला तीन पुत्र झाले .

## पावकः(फ्) पवमानश्च, शुचिरित्यग्नयः(फ्) पुरा।

## वसिष्ठशापादुत्पन्नाः(फ्), पुनर्योगगतिं(ङ्) गताः ॥ 4 ॥

शुचि + रित्यग् + नयः(फ्), वसिष्ठ + शापा + दुत्पन्नाः(फ्),पुनर् + योग + गतिं(ङ्)

त्यांची नावे पावक, पवमान आणि सूचीअशी होती. पूर्वी वशिष्ठांनी शाप दिल्यामुळे वरील नावाच्या अग्नीणीच त्यांच्या रूपात जन्म घेतला होता.पुढे योग मार्गाने हे पुन्हा अग्नीरूप झाले .

## अन्तर्धानो नभस्वत्यां(म्), हविर्धानमविन्दत।

## य इन्द्रमश्वहर्तारं(वँ), विद्वानपि न जघ्निवान् ॥ 5 ॥

नभस् + वत्यां(म्),हविर्धा + न + मविन्दत, इन्द्र + मश्व + हर्तारं(वँ)

नभस्वतीनावाच्या पत्नीपासून अंतर्धानाला हवी र्धान नावाचा एक पुत्र झाला.इंद्राने पित्याच्या अश्वमेध यज्ञातील घोडा पळवून नेला,हे कळू नाही त्याने त्याचा वध केला नाही .

## राज्ञां(वँ) वृत्तिं(ङ्) करादान- दण्डशुल्कादिदारुणाम्।

## मन्यमानो दीर्घसत्त्र- व्याजेन विससर्ज ह ॥ 6 ॥

दण्ड + शुल्कादि + दारुणाम्

राजा अंतरधान याने कर घेणे,शिक्षा करणे,दंड वसूल करणे ,ही राजाची कर्तव्य अत्यंत कठोर आणि दुसऱ्यांना कष्ट देणारी आहेत असे समजून एका दीर्घकाळ चालणाऱ्या यज्ञाच्या दीक्षेच्या निमित्ताने आपले राज्य सोडून दिले .

## तत्रापि हं(म्)सं(म्) पुरुषं(म्), परमात्मानमात्मदृक्।

## यजं(म्)स्तल्लोकतामाप, कुशलेन समाधिना ॥ 7 ॥

परमात्मा + नमात् + मदृक्, यजं(म्)स्+ तल्लो+ कता + माप

त्या यज्ञातही त्या आत्मज्ञानी राजाने पूर्ण पुरुष परमात्म्याची आराधना करून स्थिर समाधीने भगवंतांचा दिव्य लोक प्राप्त करून घेतला .

हविर्धानाद्धविर्धानी, विदुरासूत षट् सुतान्।

बर्हिषदं(ङ्) गयं(म्) शुक्लं(ङ्), कृष्णं(म्) सत्यं(ञ्) जितव्रतम् ॥ 8 ॥

हविर् + धानाद् + धविर्धानी

हे विदुरा,हवीर्धान याची पत्नी हवी र्धानी हिने बहिषद,गय,शुक्ल,कृष्ण,सत्यआणि जितव्रतनावाच्या सहा पुत्रांना जन्म दिला .

बर्हिषत् सुमहाभागो, हाविर्धानिः(फ्) प्रजापतिः।

क्रियाकाण्डेषु निष्णातो, योगेषु च कुरूद्वह ॥ 9 ॥

सुमहा + भागो, कुरूद् + वह

कुरू श्रेष्ठ विदुरा,यामध्ये हविर्धानाचामुलगा महाभाग बर्हिषदयज्ञाआधी कर्मकांड आणि योगाभ्यासात प्रवीण होता .त्याने प्रजापतीचा अधिकार प्राप्त करून घेतला .

यस्येदं(न्) देवयजन- मनु यज्ञं(वँ) वितन्वतः।

प्राचीनाग्रैः(ख्) कुशैरासी- दास्तृतं(वँ) वसुधातलम् ॥ 10 ॥

कुशै+ रासी

त्याने एका ठिकाणानंतर दुसऱ्या ठिकाणी असे पाठोपाठ इतके यज्ञ केले की,ही सर्व भूमी पूर्वेकडे टोक करून पसरलेल्या दर्भानी झाकून गेली .

सामुद्रीं(न्) देवदेवोक्ता- मुपयेमे शतद्रुतिम्।

यां(वँ) वीक्ष्य चारुसर्वाङ्गीं(ङ्), किशोरीं(म्) सुष्ठ्वलङ्कृताम्।

परिक्रमन्तीमुद्वाहे, चकमेऽग्निः(श्) शुकीमिव ॥ 11 ॥

देव + देवोक्ता, चारु + सर्वाङ्गीं(ङ्), सुष्ठ् + वलङ् + कृताम्, परि + क्रमन्ती + मुद्वाहे

राजा प्राचीन बर्हीनेब्रह्मदेवाच्या अज्ञानुसार समुद्राची कन्या शत द्रुतीतिच्याशी विवाह केला होता .सर्वांग सुंदर किशोरी शत द्रुतीसुंदर वस्त्रालंकारांनी नटून थटून जेव्हा विवाह मंडपात सप्तपदी घालत होती,तेव्हा स्वतः अग्नीदेवसुद्धा शुकीवरजसा मोहित झाला होता तसा तिच्यावर मोहित झाला .

विबुधासुरगन्धर्व- मुनिसिद्धनरोरगाः।

विजिताः(स्) सूर्यया दिक्षु, क्वणयन्त्यैव नूपुरैः ॥ 12 ॥

विबुधा + सुर + गन्धर्व, मुनि + सिद्ध + नरोरगाः, क्वण + यन्त्यैव, नवविवाहिता शतद्रुतीने

आपल्या नुपुरांच्या झंकारांनीच दिशा दिशांतील देव,असुर,गंधर्व,मुनी,सिद्ध,मनुष्य आणि नाग अशा सर्वांना वश करून घेतले .

## प्राचीनबर्हिष:(फ्) पुत्रा:(श्), शतद्रुत्यां(न्) दशाभवन् ।
## तुल्यनामव्रता:(स्) सर्वे, धर्मस्नाता:(फ्) प्रचेतस: ॥ 13 ॥

प्राचीन+ बर्हिषः(फ्), तुल्य+ नाम+ व्रता:(स्)

शतद्रुती पासून प्राचीन बर्हिलाप्रचैता नावाचे 10 पुत्र झाले .ते सर्वजण धर्मज्ञ आणि एकसारखेच नाव आणि आचरण असणारे होते .

## पित्राऽऽदिष्टा:(फ्) प्रजासर्गे, तपसेऽर्णवमाविशन् ।
## दशवर्षसहस्राणि, तपसाऽऽर्चं(म्)स्तपस्पतिम् ॥ 14॥

तपसेऽर् + णव + माविशन्,दश+ वर्ष+ सहस्राणि, तपसाऽऽर् + चं(म्)स् + तपस्पतिम्

जेव्हा पित्याने त्यांना संतान उत्पन्न करण्याची आज्ञा केली,तेव्हा त्या सर्वांनी तपश्चर्या करण्यासाठी समुद्रात प्रवेश केला .तेथे दहा हजार वर्षे तप करून त्यांनी तपाचे फळ देणाऱ्या श्रीहरींची आराधना केली .

## यदुक्तं(म्) पथि दृष्टेन, गिरिशेन प्रसीदता ।
## तद्ध्यायन्तो जपन्तश्च, पूजयन्तश्च सं(यँ)यता: ॥ 15 ॥

तद्+ ध्या + यन्तो

घरून तपश्चर्येसाठी जात असताना वाटेत श्री महादेवांनी त्यांना दर्शना देऊन कृपापूर्वक ज्याचा उपदेश केला होता,त्याचेच ते एकाग्रतापूर्वक ध्यान ,जप आणि पूजन करीत राहिले .

## विदुर उवाच

## प्रचेतसां(ङ्) गिरित्रेण, यथाऽऽसीत्पथि सङ्गम: ।
## यदुताह हर:(फ्) प्रीतस्- तन्नो ब्रह्मन् वदार्थवत् ॥ 16 ॥

यथाss + सीत् + पथि, विदुराने विचारले -

ब्रह्मन ,वाटेत प्रचेतांचा श्री महादेवांच्या बरोबर कोणता वार्ता लाभ झाला आणि त्यांच्यावर प्रसन्न होऊन भगवान शंकरांनी त्यांना जो उपदेश केला,तो अर्थपूर्ण उपदेश आपण मला सांगावा

## सङ्गम:(ख्) खलु विप्रर्षे, शिवेनेह शरीरिणाम् ।
## दुर्लभो मुनयो दध्यु- रसङ्गाद्यमभीप्सितम् ॥ 17॥

**रसङ्गा+ द्यम+ भीप्सितम्**

**ब्रह्मर्षे,शंकरांच्या बरोबर भेट होणे,देहधार्यांना अतिशय कठीण आहे .इतरांचे कशाला ?मुनिजन सुद्धा सर्व प्रकारची असती सोडून स्वतःला प्रिय असणाऱ्या त्यांची प्राप्ती करून घेण्यासाठी त्यांचे निरंतर ध्यान करतात .परंतु त्यांनाही ते प्राप्त होत नाहीत .**

## आत्मारामोऽपि यस्त्वस्य, लोककल्पस्य राधसे।

## शक्त्या युक्तो विचरति, घोरया भगवान् भवः ॥ 18 ॥

**आत्मा + रामोऽपि, यस् + त्वस्य**

**जरी भगवान शंकर आत्माराम असले,तरीसुद्धा या लोकसृष्टीच्या रक्षणासाठी ते आपल्या घोर रूपा शक्तीसह सर्वत्र संचार करीत असतात .**

## मैत्रेय उवाच

## प्रचेतसः(फ्) पितुर्वाक्यं(म्), शिरसाऽऽदाय साधवः ।

## दिशं(म्) प्रतीचीं(म्) प्रययुस्- तपस्याद्दतचेतसः ॥ 19 ॥

**पितुर् + वाक्यं(म्), तपस्या+ द्दत+ चेतसः**

**मैत्रेय म्हणाले -साधू स्वभाव प्रचैतागणं पित्याची आज्ञा शिरोधार्य मानून तप करण्याचे मनात ठरवून पश्चिम दिशेकडे गेले .**

## समुद्रमुप विस्तीर्ण- मपश्यन् सुमहत्सरः ।

## महन्मन इव स्वच्छं(म्), प्रसन्नसलिलाशयम् ॥ 20 ॥

**प्रसन्+ नसलिला+ शयम्**

**चालता चालता त्यांनी समुद्राप्रमाणे विशाल असे एक सरोवर पाहिले .ते महापुरुषांच्या चित्ताप्रमाणे अतिशय स्वच्छ होते आणि त्यात राहणारे मासे इत्यादी जीव सुद्धा प्रसन्न दिसत होते .**

## नीलरक्तोत्पलाम्भोज- कह्लारेन्दीवराकरम् ।

## हं(म्)ससारसचक्राह्व- कारण्डवनिकूजितम् ॥ 21॥

**नील+ रक्तोत् + पलाम्भोज, कह्ला+ रेन्दी+ वराकरम्, हं(म्)ससार+ सचक्राह्व**

**त्यामध्ये नीलकमळे ,लाल कमळे , रात्री , दिवसाआणि सायंकाळी उमलणारी कमळे तसेच इंदिवर इत्यादी अनेक प्रकारची सुंदर कमळे होती .त्याच्या तटावर हंस ,सारस , चक वे ,कारण डबा इत्यादी जलपक्षी विहार करीत होते .**

## मत्त*भ्रमरसौस्वर्य- हृ*ष्टरोमलताङ्घ्रिपम् ।
## प*द्मकोशरजो दि*क्षु, वि*क्षिप*त्पवनोत्सवम् ॥ 22॥

मत्त+ भ्रमर+ सौस्वर्य, हृष्टरो+ मलताङ्+ घ्रिपम् , विक्षिपत्+ पवनोत् + सवम्

त्याच्या चारी बाजूंनी निरनिराळे वृक्ष आणि वेली होत्या .त्यावर धुंद भ्रमर गुंजारव करीत होते .त्यांच्या मधुर आवाजाने आनंदीत होऊन जणू त्यांच्या अंगावर रोमांच आले होते .कमळ कोशाचे परागपुंज वायूच्या हालचालीने चारी बाजूंना उडत होते .

## त*त्र गान्धर्वमाकर्ण्य, दि*व्यमार्गमनोहरम् ।
## विसिस्म्यू राजपु*त्रास्ते, मृदं(ङ्)गपणवाद्यनु ॥ 23 ॥

गान्धर्वमा+ कर्ण्य, दिव्य+ मार्ग+ मनोहरम् ,मृदङ् + गपण+ वाद्यनु

तेथे मृदंग ,पखवाज इत्यादी वाद्यांसह अनेक दिव्य राग रागिनींच्या गायनाचा मधुर ध्वनी ऐकून त्या राजकुमारांना अतिशय आश्चर्य वाटले .

## तर्ह्येव सरसं*स्त*स्मान्- निष्क्राम*न्तं(म्) सहानुगम् ।
## उपगीयमानममर*-प्रवरं(वँ) विबुधानुगैः ॥ 24 ॥

सरसस्+ तस्मान्, उपगीय+ मान+ ममर

## त*प्तहेमनिकायाभं(म्), शितिक*ण्ठं(न्) त्रिलोचनम् ।
## प्रसादसुमुखं(वँ) वीक्ष्य*, प्रणेमुर्जातकौतुकाः ॥ 25 ॥

तप्त+ हेम+ निकायाभं(म्), प्रणेमुर् + जात+ कौतुकाः

इतक्यात त्यांनी असे पाहिले की,देवाधिदेव भगवान शंकर आपल्या गणांसह त्या सरोवराच्या बाहेर येत आहेत .त्यांचे शरीर तापलेल्या सुवर्ण राशीप्रमाणे कांतीमान आहे .कंठ निळा असून तीन नेत्र आहेत .ते भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी उत्सुक आहेत .देवांसह अनेक गंधर्व त्यांचे सुयश गात आहेत .त्यांना पाहून प्रचेतांना मोठे आश्चर्य वाटले .आणि त्यांनी शंकरांच्या चरणांना नमस्कार केला .

## स तान् प्रपन्नार्तिहरो, भगवान्धर्मव*त्सलः।
## धर्म*ज्ञान् शीलस*म्पन्नान्, प्रीतः(फ्) प्रीतानुवाच ह ॥ 26 ॥

प्रपन् + नार्ति + हरो, शील + सम्पन् + नान्

तेव्हा शरणागतांचे भय हरण करणारे धर्म वत्सल भगवान शंकर आपल्या दर्शनाने आनंदीत झालेल्या त्या

धर्मज्ञ आणि शील संपन्न राजकुमारांवर प्रसन्न होऊन त्यांना म्हणाले .

## श्रीरुद्र उवाच

**यूयं(वँ) वेदिषदः(फ्) पुत्रा, विदितं(वँ) वश्चिकीर्षितम्।**

**अनुग्रहाय भद्रं(वँ) व, एवं(म्) मे दर्शनं(ङ्) कृतम् ॥ 27 ॥**

वश्चि + कीर्षितम्

श्री महादेव म्हणाले -तुम्ही राजा प्राचीन बर्हीचेपुत्र आहात .तुमचे कल्याण असो .तुम्ही जे काही करू इच्छिता ,ते मला माहित आहे .तुमच्यावर कृपा करण्यासाठीच मी तुम्हाला दर्शन दिले आहे .

**यः(फ्) परं(म्) रं(म्)हसः(स्) साक्षात्- त्रिगुणाज्जीवसं(ञ्)ज्ञितात् ।**

**भगवन्तं(वँ) वासुदेवं(म्), प्रपन्नः(स्) स प्रियो हि मे ॥ 28 ॥**

त्रिगुणाज् + जीव + संज्ञितात्

जी व्यक्ती अव्यक्त प्रकृती आणि जीव संज्ञा पुरुष या दोन्हींचे नियामक भगवान वासुदेव यांना शरण जाते,ती मला अत्यंत प्रिय आहे .

**स्वधर्मनिष्ठः(श्) शतजन्मभिः(फ्) पुमान्,**

**विरिञ्चतामेति ततः(फ्) परं(म्) हि माम् ।**

**अव्याकृतं(म्) भागवतोऽथ वैष्णवं(म्),**

**पदं(यँ) यथाहं(वँ) विबुधाः(ख्) कलात्यये ॥ 29 ॥**

विरिञ्+ चता+ मेति

आपल्या वर्णाश्रम धर्माचे चांगल्या प्रकारे पालन करणारा पुरुष 100 जनमानंतर ब्रह्म पदाला प्राप्त होतो .यापेक्षाही अधिक पुण्य झाल्यावर तो मला प्राप्त होतो .परंतु जो भगवंतांचा अनन्य भक्त आहे ,तो मृत्यूनंतर सरळ भगवान विष्णूंच्या त्या सर्व प्रपंचातील परमपदाला प्राप्त होतो .जेथे मी आणि इतर देव आपला अधिकार संपल्यानंतर प्राप्त होतात .

**अथ भागवता यूयं(म्), प्रियाः(स्) स्थ भगवान् यथा ।**

**न मद्भागवतानां(ञ्) च, प्रेयानन्योऽस्ति कर्हिचित् ॥ 30 ॥**

मद्+ भागवता+ नां(ञ्), प्रेया+ नन्योऽस्ति

तुम्ही भगवत भक्त असल्याकारणाने मला भगवंतान इतकेचप्रिय आहात .त्याचप्रमाणे भगवंतांच्या भक्तांना सुद्धा माझ्यापेक्षा अधिक प्रिय कोणी असत नाही .

## इदं(वँ) विविक्तं(ञ्) जप्तव्यं(म्), पवित्रं(म्) मङ्गलं(म्) परम् ।
## निः(श्)श्रेयसकरं(ञ्) चापि, श्रूयतां(न्) तद्वदामि वः ॥ 31 ॥

**तद्+ वदामि**

आता मी तुम्हाला एक अतिशय पवित्र ,मंगलकारक आणि कल्याण कारक स्तोत्र सांगतो .याचा तुम्ही शुद्ध भावनेने जप करा .

## मैत्रेय उवाच

## इत्यनुक्रोशहृदयो, भगवानाह तान् शिवः ।
## बद्धाञ्जलीन् राजपुत्रान्- नारायणपरो वचः ॥ 32 ॥

**इत्यनु+ क्रोश+ हृदयो**

मैत्रेय म्हणतात -तेव्हा नारायण परायण ,करुणार्द्र हृदयभगवान शिवांनी आपल्यासमोर हात जोडून उभे असलेल्या राजपुत्रांना हे स्तोत्र ऐकविले .

## श्रीरुद्र उवाच

## जितं(न्) त आत्मविद्धुर्यस्- वस्तये स्वस्तिरस्तु मे ।
## भवता राधसा राद्धं(म्), सर्वस्मा आत्मने नमः ॥ 33 ॥

**आत्म+ विद्धुर्य**

भगवान रुद्र म्हणाले -भगवन,आपला उत्कर्ष उच्च कोटीच्या आत्मज्ञान यांना निजानंदाचा लाभ व्हावा यासाठी आहे .त्याने माझे सुद्धा कल्याण होवो .आपण नेहमी आपल्या निरतिशय परमानंद स्वरूपातच स्थित असता अशा सर्वात्मक आत्मस्वरूप आपल्याला नमस्कार असो .

## नमः(फ्) पङ्कजनाभाय, भूतसूक्ष्मेन्द्रियात्मने ।
## वासुदेवाय शान्ताय, कूटस्थाय स्वरोचिषे ॥ 34 ॥

**भूत+ सूक्ष्मेन्द्रि+ यात्मने**

आपण पद्मनाभ अर्थात सर्व लोकांचे आदिकारण आहात .सूक्ष्मभूते आणि इंद्रियांचे नियंता ,शांत, अविकारी आणि स्वयंप्रकाश वासूदेव अर्थात चित्ताचे अधिष्ठाता आहात . आपणास नमस्कार असो .

सङ्कर्षणाय सूक्ष्माय, दुरन्तायान्तकाय च ।

नमो विश्वप्रबोधाय, प्रद्युम्नायान्तरात्मने ॥ 35 ॥

प्रद्युम्ना+ यान्त+ रात्मने

आपण आज अ व्यक्त , अनंतआणि मुखाग्नीच्या द्वारा संपूर्ण लोकांचा संहार करणारे,अहंकाराचे अधिष्ठाता सं कर्षण आहात .तसेच जगाच्या उत्कृष्ट ज्ञानाचे उगमस्थान असणाऱ्या बुद्धींचे अधिष्ठाता प्रद्युम्न आहात .आपणास नमस्कार असो .

नमो नमोऽनिरुद्धाय, हृषीकेशेन्द्रियात्मने ।

नमः(फ्) परमहं(म्)साय, पूर्णाय निभृतात्मने ॥ 36 ॥

हृषी+ केशेन्द्रि+ यात्मने

आपणच इंद्रियांचे स्वामी,मनस्तत्त्वाचे अधिष्ठाता अनिरुद्ध आहात .आपण आपल्या तेजाने जग व्यापणारे सूर्यदेव आहात .आपण पूर्ण असल्यामुळे आपणास वृद्धी किंवा क्षय नाही .आपणास नमस्कार असो .

स्वर्गापवर्गद्वाराय, नित्यं(म्) शुचिषदे नमः ।

नमो हिरण्यवीर्याय, चातुर्होत्राय तन्तवे ॥ 37 ॥

स्वर्गा+ पवर्ग+ द्वाराय

आपण स्वर्ग आणि मोक्षाचे द्वार तसेच निरंतर पवित्र रूदयात राहणारे आहात .आपणच सुवर्णरूप वीर्याने युक्त आणि चातु र्होत्रकर्माचे साधन असून त्याचा विस्तार करणारे अग्नी देव आहात .आपणास नमस्कार असो .

नम ऊर्ज इषे त्रय्याः(फ्), पतये यज्ञरेतसे ।

तृप्तिदाय च जीवानां(न्), नमः(स्) सर्वरसात्मने ॥ 38 ॥

सर्व+ रसात्मने

पितर आणि देवांचे अन्न सोम आपण आहात .तसेच तिन्ही वेदांचे अधिष्ठाता आहात .आपणच सर्व प्राण्यांना तृप्त करणारे जलरूप आहात .आपणास नमस्कार असो .

सर्वसत्त्वात्मदेहाय, विशेषाय स्थवीयसे ।

नमस्त्रैलोक्यपालाय, सहओजोबलाय च ॥ 39 ॥

सर्व+ सत्त्वात्+ मदेहाय, नमस्+ त्रैलोक्य+ पालाय

आपण सर्व प्राण्यांचे देह ,पृथ्वी आणि विराट स्वरूप आहात .तसेच त्रैलोग्याचे रक्षण करणारे मानसिक,इंद्रिया विषयक आणि शारीरिक शक्तीस्वरूप वायू आहात .आपणास नमस्कार असो .

## अर्थलिं(ङ्)गाय नभसे, नमोऽन्तर्बहिरात्मने ।

## नमः(फ्) पुं*ण्याय लोकाय, अमुं*ष्मै भूरिवर्चसे ॥ 40 ॥

नमोऽन्+ तर् + बहिरात्मने

आपण आपला जो शब्द हा गुण त्याच्या द्वारा सर्व पदार्थांचे ज्ञान करून देणारे व आत बाहेर व्यापून असणारे आकाश आहात .त्याचप्रमाणे अतिशय पुण्याने प्राप्त होणारे परम तेजोमय स्वर्ग -वैकुंठादी लोक आपणच आहात .आपणास नमस्कार असो .

## प्रवृत्ताय निवृत्ताय, पितृदेवाय कर्मणे ।

## नमोऽधर्मविपाकाय, मृं*त्यवे दुःखदाय च ॥ 41 ॥

नमोऽ+ धर्म+ विपाकाय

आपण पितृ लोकांची प्राप्ती करून देणारे प्रवृत्ती कर्मरूप आणि देवलोकाच्या प्राप्तीचे साधन निवृती कर्म रूप आहात.तसेच अधर्माचे फलस्वरूप दुःखदायक मृत्यू आपणच आहात .आपणास नमस्कार असो .

## नमं*स्त आशिषामीश, मनवे कारणात्मने ।

## नमो धर्माय बृहते, कृं*ष्णायाकुं*ण्ठमेधसे ।

## पुरुषाय पुराणाय, सां(ङ्)ख्ययोगेश्वराय च ॥ 42 ॥

कृष्णाया+ कुण्ठ+ मेधसे

नाथ,आपणच पुराणपुरुष व सांख्य आणि योगाचे आदेश वर भगवान श्रीकृष्ण आहात .आपण सर्व कामनापूर्तीचे कारण मंत्रमुर्ती आणि महान धर्मस्वरूप आहात .आपली ज्ञान शक्ती कुंठीत होणारी नाही .आपणास नमस्कार असो .

## शं*क्तिं*त्रयसमेताय, मीढुषेऽहं(ङ्)कृतात्मने ।

## चेतआकूतिरूपाय, नमो वाचोविभूतये ॥ 43 ॥

मीढुषेऽ+ हं(ङ्)+ कृतात्मने

आपणच करता,कारण आणि कर्म या तिन्ही शक्तींचे एकमात्र आश्रय आहात .आपणच अहंकाराचे अधिष्ठाता रुद्र आहात .आपणच ज्ञान आणि क्रिया स्वरूप आहात .आपल्यापासूनच परा , पश्यन्ती ,मध्यमा आणि वैखरी या चार प्रकारच्या वाणींची अभिव्यक्ती होते .आपणास नमस्कार असो .

## दर्शनं(न्) नो दिदृक्षूणां(न्), देहि भागवतार्चितम् ।
## रूपं(म्) प्रियतमं(म्) स्वानां(म्), सर्वेन्द्रियगुणाञ्जनम् ॥ 44 ॥

**सर्वेन्द्रिय +गुणाञ् + जनम्**

**प्रभो,आम्हाला आपल्या दर्शनाची अभिलाषा आहे .म्हणून आपले भक्तजन ज्याचे पूजन करतात आणि जे आपल्या निजाजणांना अत्यंत प्रिय आहे,ते आपले अनुपमा रूप आम्हाला दाखवा .आपल्या गुणांनी आपले ते रूप सर्व इंद्रियांना तृप्त करणारे आहे .**

## स्निग्धप्रावृड्घनश्यामं(म्), सर्वसौन्दर्यसङ्ग्रहम् ।
## चार्वायतचतुर्बाहुं(म्), सुजातरुचिराननम् ॥ 45 ॥

**स्निग्ध+ प्रावृड्+ घनश्यामं(म्), सर्व+ सौन्दर्य+ सङ्ग्रहम्**

**चार्वा+ यत+ चतुर्बाहुं(म्), सुजा+ तरुचिरा+ ननम्**

## पद्मकोशपलाशाक्षं(म्), सुन्दरभ्रु सुनासिकम् ।
## सुद्विजं(म्) सुकपोलास्यं(म्), समकर्णविभूषणम् ॥ 46 ॥

**पद्म+ कोश+ पला+ शाक्षं(म्), सम+ कर्ण+ विभूषणम्**

**पावसाळ्यातील मेघा प्रमाणे ते रूप स्निग्ध,श्याम आणि सर्व सौंदर्याचे सार-सर्वस्व आहे .सुंदर चार विशाल हात,अत्यंत मनोर मुखारविंद ,कमल दलाप्रमाणे नेत्र ,सुंदर भुवया, डौलदारना क , मनमोहक दंतपंक्ती ,सुंदर गाल ,मनोहर मुखमंडल आणि समान दोन कान यांनी आपले रूप अधिक सुंदर दिसत आहे .**

## प्रीतिप्रहसितापां(ङ्)ग- मलकैरुपशोभितम् ।
## लसत्पङ्कजकिं(ञ्)जल्क - दुकूलं(म्) मृष्टकुण्डलम् ॥ 47 ॥

**प्रीति+ प्रहसिता+ पाङ्ग, मलकै+ रुप+ शोभितम् ,लसत्+ पङ्कज+ किञ्जल्क**

## स्फुरत्किरीटवलय- हारनूपुरमेखलम् ।
## शङ्खचक्रगदापद्म- मालामण्युत्तमर्द्धिमत् ॥ 48 ॥

**स्फुरत् + किरीट+ वलय, हार+ नूपुर+ मेखलम् ,**

**शङ्ख+ चक्र+ गदा+ पद्म, माला+ मण्युत्त+ मर्द्धिमत्**

**प्रेम पूर्ण मोहक हास्य,कुर ळे केस,काळ्या काळया कुरव्या केसांच्या बटा ,कम ल पुष्पातीलकेसराप्रमाणे फडफडणारा पितांबर ,झगमगणारी कुंडले ,चमकणारा मुकुट 'हातात कंकण,हार ,नुपुरे आणि मेखला**

**इत्यादी अलंकार,तसेच शंख चक्र गदा पद्म वनमाळा आणि कौस्तुभमणी यामुळे अपूर्व शोभायमान दिसणारे दर्शन आम्हाला द्या .**

**सिं(म्)हस्कन्धत्विषो बिभ्रत्- सौभगग्रीवकौस्तुभम् ।**

**श्रियानपायिन्या क्षिप्त- निकषाश्मोरसोल्लसत् ॥ 49 ॥**

**सिं(म्)ह+ स्कन्धत् + विषो, सौभग+ ग्रीव+ कौस्तुभम्, निकषाश्+ मोर+ सोल्लसत्**

**ज्यांचे खांदे सिंहाप्रमाणे पृष्ठ आहेत.ज्यांच्यावर हार केयूर आणि कुंडले यांची कांती झगमगत असते .तसेच कौस्तुभमण्याच्या कांती ने सुशोभित अशी मान आहे. ज्यांचे शामल वक्षः स्थळश्री श्री वत्स चिन्हाच्या रूपाने लक्ष्मीचे नित्यनिवासस्थान असल्याने सोन्याचा कस आजमावणाऱ्या कसोटीच्या शोभेवरही मात करीत आहे.**

**पूररेचकसं(वँ)विग्न- वलिवल्गुदलोदरम् ।**

**प्रतिसं(ङ्)क्रामयद्विश्वं(न्), नाभ्याऽऽवर्तगभीरया ॥ 50 ॥**

**पूर+ रेचक+ सं(वँ)विग्न, वलिवल्+ गुद+ लोदरम्**

**प्रतिसं(ङ्)क्रा+ मयद् + विश्वं(न्), नाभ्याऽऽ+ वर्त+ गभीरया**

**ज्यांचे त्रिवलीने सुशोभित पिंपळाच्या पानाप्रमाणे सुडौल पोट श्वासोच्छ्वासामुळेहलणे आणि अतिशय मनोहर दिसत आहे .त्यावर भोर्याप्रमाणे गोलाकार जी नाभी आहे,ती इतकी खोल आहे की,त्यातून उत्पन्न झालेले हे विश्व पुन्हा त्यातच लोक पाहू इच्छित आहे .**

**श्यामश्रोण्यधिरोचिष्णुर्- दुकूलस्वर्णमेखलम् ।**

**समचार्वङ्घ्रिजङ्घोरु- निम्नजानुसुदर्शनम् ॥ 51 ॥**

**श्याम+श्रोण्य+ धिरो+ चिष्णुर्, दुकूल+ स्वर्ण+ मेखलम्**

**सम+ चार्वङ्+ घ्रिजङ्+घोरु,निम्न+ जानु+ सुदर्शनम्**

**शाम वर्ण कटी प्रदेशावर पितांबर आणि सुवर्णमेखला शोभायमान झाली आहे .समान आणि सुंदर पाय ' पिंडऱ्या ,जां घआणि गोट्यांमुळे ज्यांचे शरीर अतिशय सुडौल दिसत आहे .**

**पदा शरत्पद्मपलाशरोचिषा,**

**नखद्युभिर्नोऽन्तरघं(वँ) विधुन्वता ।**

**प्रदर्शय स्वीयमपास्तसाध्वसं(म्) ,**

## पदं(ङ्) गुरो मार्गगुरुस्तमोजुषाम् ॥ 52 ॥

**शरत्+ पद्म+ पलाश+ रोचिषा, नख+ द्युभिर् + नोऽन्तरघं(वँ)**

**स्वी+ यम+ पास्त+ साध्वसं(म्), मार्ग+ गुरुस्+ तमो+ जुषाम्**

**आपल्या चरणांची शोभा शरद ऋतुतील कमल दलाच्या कांतीलाही मागे टाकील अशी आहे.त्यांच्या नखातून जो प्रकाश बाहेर पडत आहे,तो जीवांचा अज्ञानांधकारताबडतोब नाहीसा करतो .आपण आम्हाला कृपा करून भक्तांचे भय हरण करणाऱ्या आणि त्यांना आश्रय स्वरूप अशा रूपांचे दर्शन घडवा.जगद्गुरो,आम्हा अज्ञानाने वेढलेल्या प्राण्यांना आपल्या प्राप्तीचा मार्ग सांगणारे आपणच आमचे गुरु आहात .**

## एतद्रूपमनुध्येय-मात्मशुद्धिमभीप्सताम् ।

## यद्भक्तियोगोऽभयदः(स्), स्वधर्ममनुतिष्ठताम् ॥ 53 ॥

**एतद् + रूपमनु+ ध्येय, मात्म+ शुद्धि+ मभीप् +सताम्**

**यद् + भक्तियोगोऽ + भयदः(स्), स्वधर्म+ मनु+ तिष्ठताम्**

**प्रभो,चित्तशुद्धीची इच्छा करणाऱ्या माणसांनी आपल्या या रूपाचे नेहमी ध्यान केले पाहिजे .या रूपाची भक्ती हीच सदर माझे पालन करणाऱ्या पुरुषांना अभय देणारी आहे .**

## भवान् भक्तिमता लभ्यो, दुर्लभः(स्) सर्वदेहिनाम् ।

## स्वाराज्यस्याप्यभिमत, एकान्तेनात्मविद्गतिः ॥ 54 ॥

**स्वा+ राज्यस् + याप्य+ भिमत, एकान्ते+ नात्म+ विद्गतिः**

**स्वर्गाचा राजा इंद्रही आपल्यालाच प्राप्त करू इच्छितो .तसेच आत्मज्ञान्यांची गतीही आपणच आहात .आपण अभक्त देह धार्यांसाठी अत्यंत दुर्लभ आहात .केवळ भक्तिमान लोकच आपल्याला प्राप्त करून घेऊ शकता त .**

## तं(न्) दुराराध्यमाराध्य, सतामपि दुरापया ।

## एकान्तभक्त्या को वाञ्छेत्- पादमूलं(वँ) विना बहिः ॥ 55 ॥

**दुरा+ राध्य+ माराध्य**

**सतपुरुषांनाही दुर्लभ अशा अनन्य भक्तीने प्राप्त न होणाऱ्या भगवंतांना प्रसन्न करून घेणारा कोणता भक्त त्यांच्या चरण कमलाशिवाय दुसऱ्या साधनाची अपेक्षा करील ?**

## यत्र निर्विष्टमरणं(ङ्) , कृतान्तो नाभिमन्यते ।

## विश्वं(वँ) विध्वं(म्)सयन् वीर्य- शौर्यविस्फूर्जितभ्रुवा ॥ 56 ॥

निर् + विष्ट+ मरणं(ङ्), शौर्य+ विस्फूर् + जित+ भ्रुवा

**आपल्या अपूर्व उत्साह आणि पराक्रमाने फडफडणाऱ्या भुवयांच्या इशाऱ्याने संपूर्ण विश्वाचा संहार करणारा काळ सुद्धा आपल्या चरणांना शरण गेलेल्या प्राण्यांवर आपला अधिकार चालवू शकत नाही .**

## क्षणार्धेनापि तुलये, न स्वर्गं(न्) नापुनर्भवम् ।

## भगवत्सं(ङ्)गिसं(ङ्)गस्य, मर्त्यानां(ङ्) किमुताशिषः ॥ 57 ॥

क्षणार्+ धेनापि , भगवत्+ सं(ङ्)गि+ सं(ङ्)गस्य, किमुता+ शिषः

**भगवंतांच्या अशा प्रेमी भक्तांचा अर्धा क्षण जरी सत्संग घडला तरी त्याच्या तुलनेत मी स्वर्ग आणि मोक्षाची परवा करीत नाही .मग मरते लोकातील तुच्छ भोगांबद्दल काय बोलावे ?**

## अथानघाङ्घ्रेस्तव कीर्तितीर्थयो-

## रन्तर्बहिः(स्)स्नानविधूतपाप्मनाम् ।

## भूतेष्वनुक्रोशसुसत्त्वशीलिनां(म्),

## स्यात्सं(ङ्)गमोऽनुग्रह एष नस्तव ॥ 58 ॥

अथान+ घाङ्+ घ्रेस्+ तव, रन्तर्+ बहिः(स्)+ स्नान+ विधूत+ पाप्मनाम्

भूतेष्व+ नुक्रो+ शसुसत्त्व+ शीलिनां(म्), स्यात्+ सं(ङ्)ग+ मोऽनुग्रह

**प्रभो,आपले चरण संपूर्ण पापराशी नष्ट करणारे आहेत .ज्यांनी आपली कीर्ती आणि तीर्थे यामध्ये अंतर बाह्य स्नान करून आपली मानसिक आणि शारीरिक अशी दोन्ही प्रकारची पापे धुऊन टाकली आहेत तसेच जे इतरांबद्दल दया राग द्वेष विरहितचित्त आणि सरळपणा इत्यादी गुणांनी युक्त आहेत अशा भक्त जणांचा सत्संग नेहमी आम्हास मिळावा एवढीच आमची इच्छा आहे .हीच आपली आमच्यावर मोठी कृपा होईल .**

## न यस्य चित्तं(म्) बहिरर्थविभ्रमं(न्), तमोगुहायां(ञ्) च विशुद्धमाविशत् ।

## यद्भक्तियोगानुगृहीतमं(ञ्)जसा, मुनिर्विचष्टे ननु तत्र ते गतिम् ॥ 59 ॥

बहि+ रर्थ+ विभ्रमं(न्), यद् + भक्तियोगा+ नुगृहीत+ मं(ञ्)जसा, मुनिर्+ विचष्टे

**ज्या भक्ताचे चित्त भक्तीयोगाने परिपूर्ण आणि शुद्ध होऊन बाह्य विषयांकडे ओढ घेत नाही किंवा अज्ञानरूपी गुहा असलेल्या प्रकृतीत लीन होत नाही तो अनायासेच आपल्या स्वरूपाचे दर्शन घेतो .**

## यत्रेदं(वँ) व्यज्यते विश्वं(वँ), विश्वस्मिन्नवभाति यत् ।
## तत् त्वं(म्) ब्रह्म परं(ञ्) ज्योति- राकाशमिव विस्तृतम् ॥ 60 ॥

**विश्वस् + मिन्+ नवभाति**

**ज्यामध्ये हे सर्व जग दिसते आणि जे या संपूर्ण जगात भासमान होत आहे ते आकाशाप्रमाणे विस्तृत आणि परम प्रकाशमय ब्रम्ह तत्व आपणच आहात .**

## यो माययेदं(म्) पुरुरूपयासृजद्,
## बिभर्ति भूयः(ह) क्षपयत्यविक्रियः ।
## यद्भेदबुद्धिः(स्) सदिवात्मदुः(स्)स्थया,
## तमात्मतन्त्रं(म्) भगवन् प्रतीमहि ॥ 61 ॥

**पुरु+ रूपया+ सृजद्, क्षप+ यत्य+ विक्रियः, सदि+ वात्म+ दुः(स्)स्थया, तमात्म+ तन्त्रं(म्)**

**भगवन ,आपली माया अनेक प्रकारची रूपे धारण करते .हिच्या द्वारा आपण जगांची अशी निर्मिती,पालन आणि संवाद करता की ही जणू एखादी खरी वस्तू आहे .परंतु यामुळे आपल्या मध्ये कोणताही विकार उत्पन्न होत नाही .मायेमुळे इतरांमध्ये भेद बुद्धी निर्माण होते पण आपल्यावर तिचे काही चालत नाही .कारण आपण स्वतंत्र आहात याचा आम्हाला प्रत्यय आहे .**

## क्रियाकलापैरिदमेव योगिनः(श्),
## श्रद्धान्विताः(स्) साधु यजन्ति सिद्धये ।
## भूतेन्द्रियान्तः(ख्)करणोपलक्षितं(वँ),
## वेदे च तन्त्रे च त एव कोविदाः ॥ 62 ॥

**क्रिया+ कलापै+ रिदमेव, भूतेन्द्रि+ यान्तः(ख्)+ करणो+ पलक्षितं(वँ)**

**आपले स्वरूप पंचमहाभूते ,इंद्रिये आणि अंतःकरणयांचे प्रेरक या रूपाने दृश्य स्थितीला येते .जे कर्मयोगी सिद्धी प्राप्त करण्यासाठी निरनिराळ्या कर्मांच्याद्वारे आपल्या या सगुणसाकार स्वरूपाचे श्रद्धापूर्वक चांगल्या रीतीने पूजन करतात ,तेच वेद व शास्त्रे योग्य तऱ्हेने जाणणारे होत .**

## त्वमेक आद्यः(फ्) पुरुषः(स्) सुप्तशक्तिस्-
## तया रजः(स्)सत्त्वतमो विभिद्यते ।

महानहं(ङ्) खं(म्) मरुद*ग्निवार्धराः(स्) ,

सुरर्षयो भूतगणा इदं(यँ) यतः ॥ 63 ॥

मरु+ दग्नि+ वार्धराः(स्)

**प्रभो,आपणास अद्वितीय आदी पुरुष आहात .सृष्टीच्या पूर्वी आपली माया शक्ती सुप्तावस्थेत असते.नंतर तिच्याच द्वारे सत्व,रज आणि समोरून गुणांमध्ये वेद निर्माण होतो आणि त्या पाठोपाठ त्याच गुणांपासून महत्तत्व,अहंकार,आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी,देव,ऋषी आणि सर्व प्राण्यांनी युक्त अशा या जगाची उत्पत्ती होते .**

सृ*ष्टं(म्) स्वशक्त्येदमनु*प्रवि**ष्टश्-

चतुर्विधं(म्) पुरमात्मां(म्)शकेन ।

अथो वि*दुस्तं(म्) पुरुषं(म्) स*न्तम*न्तर्-

भुङ्क्ते हृषीकैर्मधु सारघं(यँ) यः ॥ 64 ॥

स्व+ शक्त्ये+ दम+ नुप्रविष्टश्, पुर+ मात्मां(म्)+ शकेन, हृषी+ कैर् + मधु

**नंतर आपण आपल्याच माया शक्तीने रचलेल्या या जरायुज ,अंड ज , स्वेदजआणि उद्भिज्जअशा चार प्रकारच्या शरीरांमध्ये अंश रूपाने प्रवेश करता आणि मधमाशी ज्याप्रमाणे आपणच उत्पन्न केलेल्या मधाचा आस्वाद घेते त्याप्रमाणे आपण ज्या अंशाने इंद्रियांच्या द्वारा या तुच्छ विषयांचा भोग घेतात्या आपल्या आयुष्यालाच शरीरातील पुरुष किंवा जीव असे म्हणतात .**

स एष लोकानतिच*ण्डवेगो,

विकर्षसि* त्वं(ङ्) खलु कालयानः ।

भूतानि भूतैरनुमेयतत्त्वो,

घनावलीर्वायुरिवाविषह्यः ॥ 65 ॥

लोका+ नति+ चण्ड+ वेगो, भूतै+ रनुमेय +तत्त्वो, घना+ वलीर् + वायुरिवा + विषह्यः

**प्रभो,आपले स्वरूप प्रत्यक्ष नसले तरी अनुमानाने समजते .प्रलय काळी कालस्वरूप आपणच प्रचंड वेगाने पृथ्वी इत्यादी पंचमहाभूतांना त्यांच्याच द्वारा विचलित करून सर्व लोकांचा संहार करता .जसा वायू आपल्या असह्य वेगाने मेघांच्या द्वाराच मेघांना नष्ट करतो .**

प्रमत्तमुच्चैरितिकृत्यचिन्तया,

प्रवृद्धलोभं(वँ) विषयेषु लालसम् ।

त्वमप्रमत्तः(स्) सहसाभिपद्यसे,

क्षुल्लेलिहानोऽहिरिवाखुमन्तकः ॥ 66 ॥

प्रमत्त+ मुच्चै+ रिति+ कृत्य+ चिन्तया, क्षुल्ले+ लिहानोऽ+ हिरिवाखु+ मन्तकः

भगवन,हा मोह ग्रस्त जीव "मला हे करावयाचे आहे ते करावयाचे आहे".या चिंतेमध्ये असतो .त्याचा लोह आणि विषयांची लालसा वाढतच असते.परंतु कालरूप आपण नेहमी सावध असता.भुकेने व्याकुळ झालेला साप ज्याप्रमाणे उंदराला एकदम पकडतो,त्याप्रमाणे काल स्वरूपाने आपण या जीवाला गिळंकृत करता .

कस्त्वत्पदाब्जं(वँ) विजहाति पण्डितो,

यस्तेऽवमानव्ययमानकेतनः ।

विशङ्कयास्मद्गुरुरर्चति स्म यद्,

विनोपपत्तिं(म्) मनवश्चतुर्दश ॥ 67 ॥

कस्+ त्वत्+ पदाब्जं(वँ), यस्तेऽवमा+ नव्ययमा+ नकेतनः

विशङ्कयास्+ मद्  + गुरुरर् + चति, विनोप+ पत्तिं(म्), मनवश् + चतुर्दश

आपली अवहेलना केल्यास स्वतःचे आयुष्य व्यर्थ जाईल ,असे मानणारा कोणता विद्वान आपल्या चरणांना विसरेल बरे !काळाच्या भीतीने त्यांची पूजा आमचे पिता ब्रह्मदेव आणि स्वायंभूवादी 14 म्हणून कोणताही विचार न करता करीत असतात .

अथ त्वमसि नो ब्रह्मन्, परमात्मन्  विपश्चिताम् ।

विश्वं(म्)  रुद्रभयध्वस्त- मकुतश्चिद्भया गतिः ॥ 68 ॥

विपश् + चिताम्, रुद्र+ भय+ ध्वस्त, मकुतश् + चिद्+ भया

ब्रह्मन,अशाप्रकारे सर्व जग रुद्ररूप काळाच्या भीतीने व्याकुळ झाले आहे .म्हणून हे परमात्म न,हे तत्व जाणणाऱ्या आमचे आपणच सर्व थैव निर्भय आश्रय आहात

इदं(ञ्) जपत भद्रं(वँ) वो, विशुद्धा नृपनन्दनाः ।

स्वधर्ममनुतिष्ठन्तो, भगवत्यर्पिताशयाः ॥ 69 ॥

स्वधर्म+ मनु+ तिष्ठन्तो, भगवत् + यर् + पिताशयाः

हे राजकुमारांनो ,विशुद्ध भावाने सदर माझे आचरण करीत,भगवंतांमध्ये चित्त लावून मी सांगितलेल्या या स्तोत्राचा तुम्ही जप करीत रहा,तुमचे कल्याण असो

तमेवात्मानमात्मस्थं(म्), सर्वभूतेष्ववस्थितम् ।

पूजयध्वं(ङ्) गृणन्तश्च, ध्यायन्तश्चासकृद्धरिम् ॥ 70 ॥

तमे+ वात्मा+ नमात्+ मस्थं(म्), सर्व+ भूतेष्व+ वस्थितम्, ध्यायन्तश् + चासकृद् + धरिम्

सर्व भूतातर्यामी व तुमच्या अंतःकरणा मध्ये असलेल्या परमात्मा,श्रीहरीचेच तुम्ही वारंवार स्तवन आणि चिंतन करीत पूजन करा .

योगादेशमुपासाद्य, धारयन्तो मुनिव्रताः ।

समाहितधियः(स्) सर्व, एतदभ्यसताद्दताः ॥ 71 ॥

योगा+ देश+ मुपा+ साद्य, समा+ हित+ धियः(स्), एत+ दभ्य+ सता+ द्दताः

मी तुम्हाला सांगितलेले हे योगा देश नावाचे स्तोत्र मनामध्ये धारण करून मुनी व्रताचे आचरण करीत याचा एकाग्रतेने आदरपूर्वक अभ्यास करा .

इदमाह पुरास्माकं(म्), भगवान् विश्वसृक्पतिः ।

भृग्वादीनामात्मजानां(म्), सिसृक्षुः(स्) सं(म्)सिसृक्षताम् ॥ 72 ॥

भगवान् + विश्व+ सृक्पतिः, भृग्वादी+ ना+ मात्म+ जानां(म्), सं(म्)सि+ सृ+ क्षताम्

हे स्तोत्र पूर्वी जगात विस्तार करू इच्छिणाऱ्या प्रजापतींचे पती भगवान ब्रह्मदेवांनी ,प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा करणाऱ्या आम्हा भृगु वगैरे पुत्रांना ऐकविले होते .

ते वयं(न्) नोदिताः(स्) सर्वे, प्रजासर्गे प्रजेश्वराः ।

अनेन ध्वस्ततमसः(स्), सिसृक्ष्मो विविधाः(फ्) प्रजाः ॥ 73 ॥

ध्वस्त+ तमसः(स्)

जेव्हा आम्हा प्रजापतींना प्रजेचा विस्तार करण्याची आज्ञा झाली,तेव्हा याच्या द्वारा आम्ही आपले अज्ञान घालवून अनेक प्रकारची प्रजा उत्पन्न केली होती .

अथेदं(न्) नित्यदा युक्तो, जपन्नवहितः(फ्) पुमान् ।

अचिराच्छ्रेय आप्नोति, वासुदेवपरायणः ॥ 74 ॥

जपन्न+ वहितः(फ्),अचिरा+ च्छ्रेय, वासुदेव+ परायणः

आता सुद्धा जो भगवतपरायण पुरुष याचा एकाग्र चित्ताने दररोज जप करील,त्याचे तात्काळ कल्याण होईल.

श्रेयसामिह सर्वेषां(ञ्), ज्ञानं(न्) निः(श्)श्रेयसं(म्) परम् ।

सुखं(न्) तरति *दुष्पारं(ञ्), ज्ञाननौर्व्यसनार्णवम् ॥ 75 ॥

श्रेयसा+ मिह, ज्ञा+ ननौर् + व्यसनार् + णवम्

या लोकी सर्व प्रकारच्या कल्याण साधनांमध्ये मोक्षदायक ज्ञानच सर्वश्रेष्ठ आहे .ज्ञाननौकेत बसलेला पुरुष अनायासेस हा दुस्तर संसार सागर पार करून जातो .

य इमं(म्) *श्रद्धया *युक्तो, *मद्गीतं(म्) भगवत्स्तवम् ।

अधीयानो दुराराध्यं(म्), हरिमाराध*यत्यसौ ॥ 76 ॥

भगवत्+ स्तवम्, दुरा+ राध्यं(म्), हरि+ मारा+ धयत्+ यसौ

भगवंतांची आराधना करणे जरी कठीण असले तरी मी सांगितलेल्या या स्तोत्राचा जो श्रद्धापूर्वकपाठ करील,तो त्यांना प्रसन्न करून घेईल .

विन्दते पुरुषोऽ*मुष्मा-*द्यद्य*दि*च्छे*त्यसत्वरम् ।

*मद्गीतगीतात्*सुप्रीताच्- छ्रेयसामेकवल्लभात् ॥ 77 ॥

पुरुषोऽ+ मुष्मा, द्यद्यदिच् + छत्य+ सत्वरम्, मद्गीत+ गीतात्+ सुप्रीताच्

छ्रेय+ सामेक+ वल्लभात्

सर्व कल्याण साधनांचे प्राप्तव्य एक भगवंत आहेत .म्हणून मी गाईलेल्या या स्तोत्राने त्यांना प्रसन्न करून जो कोणी जे काही मागेल ,ते त्याला प्राप्त होईल .

इदं(यँ) यः(ख्) *कल्य *उत्था*य, प्राञ्जलिः(श्) *श्रद्धयान्वितः ।

शृणुयाच्छ्रावयेन्मर्त्यो, *मुच्यते कर्म*बन्धनैः ॥ 78 ॥

शृणु + याच् + छ्राव+ येन् + मर्त्यो

जो पुरुष प्रातःकाळी उठून श्रद्धापूर्वक हात जोडून हे ऐकेल किंवा ऐकवील,तो सर्व प्रकारच्या कर्म बंधनातून मुक्त होईल .

गीतं(म्) मयेदं(न्) नरदेवनन्दनाः(फ्),

परस्य पुंसः(फ्) परमात्मनः(स्) स्तवम् ।

जपन्त एकाग्रधियस्तपो महच्-

चरध्वमन्ते तत आप्स्यथेप्सितम् ॥ 79 ॥

नरदेव+ नन्दनाः, एका+ ग्रधियस्+ तपो, चर+ ध्वमन्ते, आप्स्य+ थेप्+ सितम्

**हे राजकुमारांनो ,परमपुरुष परमात्म्याचे मी तुम्हाला हे जे स्तोत्र ऐकविले,त्याचा एकाग्रचित्ताने जप करीत तुम्ही मोठे तप करावे .ते पूर्ण झाल्यावर यापासूनच तुम्हाला इच्छित फळ प्राप्त होईल .**

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(ञ्)

चतुर्थस्कन्धे रुद्रगीतं(न्) नाम चतुर्विंशोऽध्यायः ॥

